# University of Mumbai

पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग,
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई - ४०० ०९८.

क्र. परीक्षा / पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/ ५५२ /२०१९

परिपत्रक :-

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र. परीक्षा / पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/१९८/२०१९, दि. १९ नोव्हेंबर, २०१९ अन्वये, द्वितीय सत्र २०१९ मध्ये विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षांचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतीसाठींचे अर्ज स्वीकारण्याबाबत कळविण्यात आलेले असून; यामध्ये इतर अभ्यासक्रमाच्या परीक्षांसह B.E. (Sem- VII) (Credit Based/CBSGS) या अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठीचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतीसाठींचे अर्ज व यांसाठीचे विहित शुल्क Online पद्धतीने विद्यापीठाच्या www.mu.ac.in या अधिकृत संकेत स्थळावरून घेण्यात येणार आहेत असे अवगत करण्यात आले होते.

परंतु, B.E. (Sem- VII) (Credit Based/CBSGS) या अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठी प्रविष्ठ विद्यार्थी संख्या अत्यल्प असल्याकारणाने या अभ्यासक्रमाचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतीसाठींचे अर्ज व यांसाठीचे विहित शुल्क Online ऐवजी **हार्ड कॉपी (पारंपरिक अर्ज) पद्धतीने स्वीकारण्यात येणार आहेत.**

**तरी, उपरोक्त अभ्यासक्रमासाठीच्या पुर्नमूल्यांकन व छायांकित प्रतींसाठीचे अर्ज संबंधित शाखेच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासुन २० दिवसाच्या आत तसेच ज्या शाखांच्या परीक्षांचे निकाल हे परिपत्रक निर्गमित होण्या अगोदर जाहिर झालेले आहेत, अश्या शाखांसाठी परिपत्रक निर्गमित केल्यापासून २० दिवसांच्या आत सॉफ्ट कॉपी(सी.डी) व हार्ड कॉपी (पारंपरिक अर्ज) स्वरूपात व परिपुर्णरित्या भरून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहीशिक्क्यानिशी विहित शुल्कासह परीक्षा विभागातील पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला, येथे स. ११.०० ते दु. २.३० या कालावधीत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.**

**अर्ज सादर करण्यासाठीच्या विशेष महत्वाच्या सुचना:-**

१) पुर्नमुल्याकंनाच्या अर्जासाठी स्वतंत्र सी.डी व पत्र तसेच छायांकित प्रतीच्या अर्जासाठी स्वतंत्र सी.डी व पत्र सादर करावीत.

२) सदर दोन्ही बाबी एकाच सी.डी. व त्यासाठी एकच पत्र असल्यास अर्ज स्विकारले जाणार नाही.

३) अर्ज परिपुर्णरित्या व अचूक भरलेले आहे याची खात्री करून घ्यावी. अर्ज अपुर्ण भरलेला व अर्जात चूकीची माहिती असल्यास व यामुळे भविष्यात काही बाबी उद्‌भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

४) अर्ज स्वीकारण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत.



Scanned by CamScanner

# University of Mumbai

उपरोक्त बाबत **शुल्काचा तपशील:-**

| | खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी | राखीव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी (Those who get concession in tution fees and other fees) |
|---|---|---|
| अर्ज शुल्क :- | रू. १०/- | रू. १०/- |
| पुर्नमुल्यांकन शुल्क :- | रू. २५०/- | रू. १२५/- |
| छायांकित प्रत शुल्क :- | रू. ५०/- | रू. २५/- |

तरी उपरोक्त बाबीची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : ३१ डिसेंबर, २०१९

अ. प्रत:-

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्य.

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. केंद्रीय संगणक सुविधा विभागातील सर्व अधिकारी वर्ग
२. सर्व उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ
३. सर्व सहायक कुलसचिव, मुंबई विद्यापीठ

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांचे स्विय सहायक



Scanned by CamScanner